# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/11/2022 (रविवार) दुपार

---

## धारदार शस्त्र जवळ बाळगणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. कन्हान –** अंतर्गत केमिकल ग्राउंड कन्हान येथे दिनांक १२/११/२०२२ चे १८.५० वा. ते १९.२० वा. सुमारास पोलीस स्टेशन कन्हान येथील पोलीस पथक कन्हान हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गुप्त मुखबिरव्दारे माहिती मिळाली की, केमीकल ग्राउंड, कन्हान जवळ दोन ईसम पायी फिरत असुन त्यापैकी एका इसमाजवळ चाकु सारखे धारदार शस्त्र दिसत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरून नमुद घटनास्थळी कन्हान पोलीस पथकाने जावून सदर ईसमावर शस्त्र बाळगल्याबाबत रेड केली असता तसेच त्याची अंगझडती घेतली असता आरोपी नामे– राहुल रामेश्वर चौधरी, वय १९ वर्ष, रा. पिडकेपार, स्कुल टोली, मुर्री गोंदिया याच्या कंबरेच्या डाव्या बाजुस एक स्टील चा चाकु मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस नाईक अतिश मानवटकर, ब.नं. ११८५ पोलिस स्टेशन कन्हान यांच्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम कलम ४, २५ आर्म ॲक्ट (भारतीय हत्यार कायदा), सहकलम १३५ मु. पो. का. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. सावनेर –** अंतर्गत माळेगाव येथे दिनांक १२/११/२०२२ चे १३.३० वा. दरम्यान सुमारास फिर्यादी नामे– सिताराम दुलारजी मरसकोल्हे, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. १, माळेगाव ता. सावनेर व आरोपी नामे– निलेश दुलारजी मरसकोल्हे, रा. माळेगाव फिर्यादी व आरोपी हे सख्खे नातेवाईक असुन, वरिल नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याने आपली मुले आरोपी जवळ ठेवुन गावाला जावुन उशिरा आल्याचे कारणावरून यातील आरोपी याने फिर्यादी सोबत झगडा भांडण करून लाकडी काठीने फिर्यादीचे दोन्ही पायावर मारून जखमी केले व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भा.द.वि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन सावनेर करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर